नवप्रभा

शनिवार दि. १६ ऑगस्ट २०१४

# हळबे महाविद्यालयात ग्रंथालय दिन

दोडामार्ग (न. वा.)

विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या उपयोग व्यक्तिगत फायद्यासाठी करतानाच देशाच्या विकासासाठी करावा असे आवाहन लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले. महाविद्यालयात आयोजित केलेल्या भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंती समारोहात ते बोलत होते. व्यासपीठावर ग्रंथपाल रामकिसन मोरे, प्रा. डी. वाय. बर्वे, प्रा. पी. एन. ढेपे, प्रा. एस. एन. खडपकर, प्रा. एम. टी. बेग आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन ग्रंथपाल रामकिसन मोरे यांनी के ले. प्रा. डी. वाय. बर्वे यांनी आभार मानले.